# मंत्रिमंडळ निर्णय

## ६ ऑक्टोबर २०१०

१. सवलतीच्या दरात ५ जीवनावश्यक वस्तूंच्या वितरणाची योजना डिसेंबर, २०१० पर्यन्त चालू राहणार.

२. ट्रायसेम व लघु औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ.

३. औष्णिक विद्युत व नैसर्गिक वायुवर आधारित प्रकल्प उभारणीसाठी संयुक्त उपक्रम कंपनी स्थापण्यास मान्यता.

४. केंद्र पुरस्कृत आणि राज्याच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या संनियंत्रणाकरिता कार्यक्रम सनियंत्रण व मूल्यमापन प्रणाली.

५. ग्रामीण भागातील रस्त्यांवर सौर दिव्याचे खांब बसविण्याच्या योजनेला मान्यता.

६. आशियायी विकास बँक (ADB) सहाय्यीत 'कृषि व्यापारविषयक पायाभूतसुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम (ABIDIP)' या प्रकल्पास मान्यता.

७. उभारणीखालील १२५० टी.सी.डी. क्षमतेच्या सहकारी साखर कारखान्यांच्या प्रकल्प किंमतीत वाढ.

८. सातारा, सांगली जिल्ह्यातील पवनऊर्जा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत निर्णय.

९. वाशिम येथे जिल्हा न्यायालय स्थापन करण्याचा निर्णय.

१०. राज्यातील ३१ जिल्ह्यात १०० टक्क्यांपेक्षा अधिक पाऊस : ज्वारी, बाजरी पिकांच्या काढणीस सुरुवात.

# सवलतीच्या दरात ५ जीवनावश्यक वस्तूंच्या वितरणाची योजना डिसेंबर, २०१० पर्यन्त चालू राहणार

सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत ऑक्टोबर, २०१० ते डिसेंबर, २०१० या कालावधीत सवलतीच्या दराने गहू, तांदूळ, तूरडाळ, साखर व पामतेल या ५ वस्तूंचे लाभार्थ्यांस शिधावाटप दुकानातून वितरणाचे सध्याचे भाव कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी अंदाजे १८४.०६ कोटी रुपये एवढया भांडवली खर्चास व **प्रतिमाह ४६.७८ कोटी** रुपये ( तीन महिन्यांसाठी दि. ३१ डिसेंबर, २०१० अखेर पर्यंत **१४०.३४ कोटी** ) एवढा आर्थिक भार सोसून वरील योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली.

या योजनेअंतर्गत स्वस्त धान्य दुकानातून एपीएलच्या लाभार्थ्यांसाठी १५ किलो अन्नधान्य उपलब्ध करुन देण्याकरीता अतिरिक्त गहू ७ रुपये २० पैसे प्रति किलो व तांदूळ ९ रुपये ६० पैसे प्रति किलो, प्रतिकार्ड २ किलो साखर २०/- रुपये प्रति किलो या दराने तसेच सर्व लाभार्थ्यांसाठी (एपीएल, बीपीएल व अंत्योदय योजना ) एक किलो तूरडाळ ५५/- रुपये प्रति किलो व एक लिटर पामतेल ३०/- रुपये प्रति लिटर या दराने रास्त भाव दुकानांमार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल. अतिरिक्त गहू, तांदूळ व साखरेसाठी एपीएल लाभार्थ्यांची संख्या १.३९ कोटी तर तूरडाळ व पामतेलासाठी लाभार्थ्यांची संख्या २ कोटी (एपीएल, बीपीएल व अंत्योदय योजना) इतकी आहे.

एपीएल लाभार्थ्यांकरिता जिल्ह्यांकडून जादा गव्हाची मागणी आल्यास तो उपलब्धतेनुसार वितरीत करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

----------

## ट्रायसेम व लघु औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ

ट्रायसेम प्रशिक्षण केंद्र व लघु औद्योगिक प्रशिक्षण संस्था केंद्रांमधील कंत्राटी कर्मचा-यांना देण्यात येणा-या मानधनात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला.

गटनिदेशकाला ३३०० रुपये, निदेशकाला २९०० रुपये, लिपिकाला १००० रुपये, शिपायाला ८०० रुपये मानधन देण्यात येत होते आता ते अनुक्रमे दरमहा ६५०० रुपये, ५५०० रुपये, ४००० रुपये व ३००० रुपये एवढे मिळेल.

मानधनात वाढ केल्यामुळे शासनावर दरवर्षी ५७ लाख ८१ हजार रुपयांपेक्षाही जास्त खर्चाचा बोजा पडणार आहे.

---------

## औष्णिक विद्युत व नैसर्गिक वायुवर आधारित प्रकल्प उभारणीसाठी संयुक्त उपक्रम कंपनी स्थापण्यास मान्यता

राज्यात २ x ६६० मेगावॅट क्षमतेचा कोळसा इंधनावर आधारित औष्णिक विद्युत प्रकल्प किंवा १५०० मेगावॅट क्षमतेचा नैसर्गिक वायुवर आधारित प्रकल्प उभारण्यासाठी महानिर्मिती कंपनी व मे.भारत हेवी इलेक्ट्रीकल्स् लिमिटेड यांची संयुक्त उपक्रम कंपनी स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. वरीलपैकी कोणता पर्याय निवडावयाचा हे इंधनाच्या उपलब्धतेवर अवलंबून राहील.

तसेच सदर प्रकल्पाला लागणाऱ्या जमीन संपादनासाठी व संयुक्त उपक्रम कंपनी करार स्वाक्षरीत करण्यासाठी मान्यता दिली आहे.

कोळशावर आधारित विद्युत प्रकल्पासाठी ११२२० कोटी रुपये तर गॅसवर आधारित प्रकल्पासाठी ६७५० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. प्रकल्पाच्या प्राथमिक अंदाजित किंमतीच्या ५.२ टक्के रक्कम शासनाच्या भागभांडवलापोटी उपलब्ध करुन देण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली.

----------

६ ऑक्टोबर २०१०

## केंद्र पुरस्कृत आणि राज्याच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या संनियंत्रणाकरिता कार्यक्रम सनियंत्रण व मूल्यमापन प्रणाली

केंद्र पुरस्कृत आणि राज्याच्या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीच्या सनियंत्रणाकरिता केंद्र शासनाने सुरू केलेली कार्यक्रम सनियंत्रण व मूल्यमापन प्रणाली (PMES) तात्काळ लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला.

२०१०-११ या वर्षात कार्यक्रम सनियंत्रण व मूल्यमापन प्रणाली (PMES) अंतर्गत शासनाच्या ध्येयधोरणानुसार प्रत्येक विभागाच्या मंत्रिमहोदयांच्या मान्यतेने विभागात राबविण्यात योजनांचे प्राधान्यक्रम आणि त्यातील उद्दीष्ट निर्धारित करून विविध प्रपत्रातील फलनिष्पत्ती आधारित दस्तऐवज तयार करण्यात आले आहेत. पुढील आर्थिक वर्षासाठी प्रत्येक विभागांच्या सचिवांमार्फत फलनिष्पत्ती आधारित दस्तावेज ३१ मार्च पर्यंत तयार करून मंत्रीमहोदयांची मान्यता घेण्यात येईल.

प्रत्येक विभागाचे फलनिष्पत्ती आधारित दस्तावेज प्रत्येक विभागाच्या संकेतस्थळावर १५ एप्रिलपर्यंत प्रसारित केले जातील. यामुळे विभागाच्या कामात पारदर्शकता येईल व विभागाच्या कामकाजाची जनतेला माहिती होईल. उद्दीष्ट/कार्यक्रम अंमलबजावणीबाबत फलनिष्पत्ती आधारित दस्तावेजनुसार प्रत्येक आर्थिक वर्षात वर्षातून दोनदा आढावा घेण्यात येईल. प्रत्येक विभागाचे फलनिष्पत्ती आधारित दस्तावेजनुसार सहामाही नंतर उच्चाधिकार समिती विभागाच्या रिझल्ट फ्रेमवर्क डॉक्युमेंट मधील नमूद उद्दीष्ट कार्यक्रम व प्रत्यक्ष कार्यवाही याचा आढावा घेण्यात येईल व त्याच्या अंमलबजावणीमध्ये आवश्यकतेनुसार अनुरूप सुधारणा करण्यात येतील. याचा आढावा घेण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समिती गठित करण्यात येत असून या समितीचा अहवाल मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येईल. सध्या याचे सनियंत्रण सामान्य प्रशासन विभाग (रचना व कार्ये व प्रशासकीय सुधारणा) यांच्याकडून करण्यात येईल. या कार्यक्रमाअंतर्गत विविध विभागाच्या कामकाजाचे शासनाच्या ध्येयधोरणानुसार उद्दीष्टपूर्तीचे मूल्यमापन स्वतंत्र यंत्रणेबाबत करण्यास मान्यता देण्यात आली.

----------

६ ऑक्टोबर, २०१०

## ग्रामीण भागातील रस्त्यांवर सौर दिव्याचे खांब बसविण्याच्या योजनेला मान्यता

ग्रामीण भागाला पर्यावरण संतुलन प्रणित मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने आणि भारनियमन टाळून विनाव्यत्यय अपारंपारीक स्त्रोतातून निर्मित वीजेचा पुरवठा व्हावा यासाठी ग्रामीण भागातील रस्त्यांवर सौर दिव्यांचे खांब ( Solar street light) बसविण्याच्या योजनेला मान्यता देण्यात आली.

एका सौर पथ दिव्यासाठी केंद्राकडून ९,६०० रुपये इतके अनुदान मिळते. त्याशिवाय राज्य निधीतून प्रति सौर दिवा रु.९,६०० रुपये अनुदान देण्यास मान्यता देण्यात येते. उर्वरीत निधी ग्रामपंचायतींनी त्यांना मिळणा-या १३ व्या वित्त आयोगाच्या तरतूदीतून, बॅकवर्ड रीजन ग्रॅण्ट फंडच्या (बी.आर.जी.एफ.) निधीतून किंवा त्यांना उपलब्ध इतर स्वनिधीतून भागवण्यात येईल.

यावर्षी या योजनेकरिता सरासरी १०,००० सौर दिव्याचा कार्यक्रम विचारात घेऊन रुपये ९ कोटी ८७ लाख रुपये राज्य शासन हिश्श्याकरिता उपलब्ध करुन देण्यात येतील.

आदिवासी क्षेत्रातील गावे, पाडे, वाडया अशा ठिकाणी सौर दिव्यांची विशेष आवश्यकता विचारात घेवून अशा भागातील ग्राम पंचायतींना प्राधान्य देण्यात येईल. या भागात जादा सौर दिव्यांसाठी राज्य शासनाच्या हिश्श्यापोटी जादा निधी आवश्यक असल्यास आदिवासी उपयोजनेतून उपलब्ध करण्यात येईल.

---------

६ ऑक्टोबर, २०१०

## आशियायी विकास बँक (ADB) सहाय्यीत 'कृषि व्यापारविषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम (ABIDIP)' या प्रकल्पास मान्यता

आशियायी विकास बँक सहाय्यीत 'कृषि व्यापारविषयक पायाभूत सुविधा विकास गुंतवणूक कार्यक्रम' या सुमारे १००० कोटी गुंतवणुकीच्या प्रकल्पास मान्यता देण्यात आली.

या प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील सर्व जिल्हयांतील प्रमुख कृषि उत्पादनांकरीता 'एकात्मिक मूल्य साखळयांची' उभारणी करण्यात येणार असून तेथे पणनविषयक पायाभूत सुविधा (मोबाईल संकलन केंद्र, क्लिनींग, ग्रेडींग व पॅकींग यंत्रणा, रायपनिंग चेंबर, शीत-गृह, गोदाम, शीत-साखळी इ.) 'हब व स्पोक' धर्तीवर उभारण्यात येणार आहेत. या एकात्मिक मूल्य साखळयांची उभारणी सार्वजनिक-खाजगी भागिदारीतून बांधा-वापरा-हस्तांतरित करा (BOT) या तत्वावर करण्यात येणार आहे. एकात्मिक मूल्य साखळीच्या प्रकल्प किंमतीच्या किमान ६०% गुंतवणूक खाजगी गुंतवणूकदारांनी करावयाची असून प्रकल्प किंमतीच्या कमाल ४०% मर्यादेपर्यंत अनुदान तसेच प्रकल्पाकरीता आवश्यक जमीन राज्य शासन उपलब्ध करुन देणार आहे. खाजगी गुंतवणूकदारांनी या एकात्मिक मूल्य साखळयांचे कार्यान्वयन २० वर्षापर्यंत करावयाचे असून त्यातुन प्राप्त होणारे संपूर्ण महसूली उत्पन्न खाजगी गुंतवणूकदारांस मिळेल व २० वर्षानंतर ही सर्व मालमत्ता राज्य शासनाच्या मालकीची होईल.

---------

## उभारणीखालील १२५० टी.सी.डी. क्षमतेच्या सहकारी साखर कारखान्यांच्या प्रकल्प किंमतीत वाढ

उभारणीखालील १२५० टी.सी.डी. क्षमतेच्या सहकारी साखर कारखान्यांच्या प्रकल्प किंमत २८ कोटी रुपयांवरुन ४५ कोटी रुपये करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सिमेंट, स्टील व तदअनुषंगिक बाबींच्या दरामध्ये गेल्या १० वर्षात झालेली वाढ विचारात घेता दि. ४.८.२००० च्या शासन निर्णयान्वये १२५० टीसीडी क्षमतेच्या सहकारी साखर कारखान्याची निश्चित केलेली प्रमाणित किंमत २८ कोटी रुपयांवरुन ४५ कोटी रुपये एवढी सुधारीत करण्यात येईल.

उभारणीखालील ६ कारखान्यांना एनसीडीसीने मंजूर केलेल्या प्रकल्प किमतीनुसार उपलब्ध करुन देण्याचे वित्तीय सहाय्य व सुधारीत प्रकल्प किमतीनुसार उपलब्ध करुन देण्याचे वित्तीय सहाय्य या दोन्हीतील फरकाची रक्कम तसेच पूर्वीच्या प्रमाणित प्रकल्प किंमतीनुसार देय असलेले शासकीय भागभांडवल व सुधारीत प्रकल्प किंमतीनुसार देय असलेल्या शासकीय भागभांडवलातील फरकची ५० कोटी ९८ लाख रुपये रक्कम वित्तीय संस्थेकडून कर्ज रुपाने उभारण्यास कारखान्याने केलेल्या विनंतीनुसार शासन थकहमी देण्यात येईल.

शरद सहकारी साखर कारखाना औरंगाबाद या कारखान्यास जुन्या मशिनरीचे पार्ट्स बदलण्यासाठी व पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यासाठी ३४५ कोटी ४ लाख रुपये एवढे वाढीव कर्ज सहाय्य एनसीडीसी कडून राज्य शासनामार्फत उपलब्ध करुन देण्याबाबत एनसीडीसीकडे शिफारस करण्यात येईल.

----------

## सातारा, सांगली जिल्ह्यातील पवनऊर्जा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत निर्णय

सातारा, सांगली जिल्ह्यातील पवनऊर्जा प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्यासंदर्भात चर्चा होऊन काही निर्णय घेण्यात आले.

अतिक्रमणाच्या प्रकरणात शेतकरी / कंपन्याकडून सहकार्य मिळत नसल्याने हे वाद मिटविण्यासाठी सातारा व सांगली या जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी, संबंधित जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक, संबंधित उप वनसंरक्षक आणि महाऊर्जाचा प्रतिनिधी यांची समिती स्थापन करावी.

अतिक्रमणासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रलंबित असलेल्या तक्रारीवर सुनावणी घेऊन तीन महिन्यात समेट करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी करावी. समेट न झाल्यास दोन्ही पक्षांना अपील करण्यासाठी मुभा असून विभागीय आयुक्त, पुणे हे अपिलीय अधिकारी असतील. अपिल प्रकरणावर त्यांनी एक महिन्याच्या आत निर्णय घ्यावा. त्यांनी घेतलेला निर्णय अंतिम राहील.

कर आकारणी करताना आकारणीचा दर रुपये १५ हजार प्रति मेगावॅट पेक्षा अधिक होणार नाही या पध्दतीने करावी.

पवन ऊर्जा प्रकल्पांसाठी प्रवर्तकानी घेतलेल्या जमिनीसंदर्भात संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडे अकृषी जमीन (नॉन ॲग्रिकल्चर लँड) करण्याबाबतची काही प्रकरणे प्रलंबित असल्यास अशा प्रकरणी नमूद केलेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात येणाऱ्या समितीबाबत प्राधान्याने निर्णय घेण्यात यावा.

----------

## वाशिम येथे जिल्हा न्यायालय स्थापन करण्याचा निर्णय

वाशिम जिल्हा हा स्वतंत्र न्यायिक जिल्हा म्हणून निर्माण करण्यास व त्यासंबंधी आवश्यक असलेल्या प्रमुख जिल्हा न्यायाधिश व मुख्य न्यायदंडाधिकारी व इतर आवश्यक पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यांत आली.

वाशिम जिल्ह्याची निर्मिती होऊनही दिवाणी अधिनियम, १८६९ अन्वये वाशिम हा न्यायिक जिल्हा म्हणून अद्याप घोषित झालेला नव्हता. दुय्यम न्यायालयातील प्रकरणांचे वाढते प्रमाण तसेच नागरिकांना त्यांच्या दारी तात्काळ न्याय देण्याची व्यवस्था करणे हे राज्य सरकारचे कर्तव्य आहे. हे विचारात घेऊन वाशिम जिल्ह्याकरीता न्यायिक जिल्हा म्हणून घोषित करणे आवश्यक होते. त्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला.

---o---

# राज्यातील ३१ जिल्ह्यात १०० टक्क्यांपेक्षा अधिक पाऊस
# ज्वारी, बाजरी पिकांच्या काढणीस सुरुवात

राज्यातील ३१ जिल्ह्यांमध्ये १०० टक्क्यांपेक्षा अधिक पाऊस झाला आहे. नाशिक आणि नंदूरबार या २ जिल्ह्यांमध्ये ८० ते १०० टक्के पाऊस झाला आहे. राज्यात ४ ऑक्टोबर अखेर ३५५ तालुक्यांपैकी १८ तालुक्यात ६० ते ८० टक्के, ५७ तालुक्यात ८० ते १०० टक्के आणि २८० तालुक्यात १०० टक्क्यांपेक्षा अधिक पाऊस झाला.

राज्याची ४ ऑक्टोबर अखेर दैनंदिन पावसाची सरासरी १११७.५ मि.मि. असून प्रत्यक्ष १३२५.३ मि.मि.म्हणजेच सरासरीच्या ११८.६ टक्के पावसाची नोंद झाली आहे.

**<u>राज्यात १४० लाख हेक्टर क्षेत्रात पेरणी</u>**

राज्याचे खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १३२.३४ लाख हेक्टर असून दिनांक ४ ऑक्टोबर २०१० अखेर १४०.२४ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता १०६ टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झालेली आहे.

राज्यातील खरीप पिकांची वाढ समाधानकारक आहे. भात पीक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहेत. सोयाबीन, ज्वारी, बाजरी ही पिके दाणे भरणे ते काढणीस सुरूवात झाली आहे. कापूस पीक पाते लागणे ते बोंडे लागण्याच्या अवस्थेत आहेत. मूग आणि उडीद पिके पक्वतेच्या अवस्थेत असून त्यांची काढणी सुरु आहे.

**<u>कोकण विभागात ५.११ लाख हेक्टरात पेरणी</u>**

या विभागात हवामान ढगाळ व दमट होते. विभागात खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ५.०९ लाख हेक्टर असून ५.११ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता १०० टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी/लावणी झ ालेली आहे.

**<u>नाशिक विभागात पिके समाधानकारक</u>**

खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १९.८८ लाख हेक्टर असून २१.३६ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता १०७ टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली आहे. पेरणी झालेल्या खरीप पिकांची वाढ समाधानकारक आहे.

**<u>पुणे विभागात ८.३८ लाख हेक्टर क्षेत्रात पेरणी</u>**

खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ७.५४ लाख हेक्टर असून ८.३८ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता १११ टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली आहे.

**<u>कोल्हापूर विभागात ९५ टक्के क्षेत्रावर पेरणी</u>**

खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ९.८१ लाख हेक्टर असून ९.२९ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता ९५ टक्के क्षेत्रावर खरिप पिकांची पेरणी झाली आहे.

**औरंगाबाद विभागात १८.५३ लाख हेक्टरात पेरणी**

खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १५.९३ लाख हेक्टर असून १८.५३ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता ११६ टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली आहे

**लातूर विभागात खरीप पिकांची वाढ समाधानकारक**

खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र २४.४९ लाख हेक्टर असुन २५.६४ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता १०५ टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झाली आहे.

**अमरावती विभागात ३२.८८ लाख हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणी**

खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र ३१.९२ लाख हेक्टर असुन ३२.८८ लाख हेक्टर क्षेत्रावर खरीप पिकाची पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता १०३ टक्के क्षेत्रावर खरीप पिकांची पेरणी झालेली आहे.

**नागपूर विभागात १९.२० लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी**

खरीप पिकाखालील सरासरी क्षेत्र १७.६९ लाख हेक्टर असून १९.२० लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. सरासरी क्षेत्राशी तुलना करता १०९ टक्के क्षेत्रावर खरीप पिकाची पेरणी झाली आहे.

## जलाशय साठ्यात लक्षणीय वाढ

राज्यामध्ये गेल्या वर्षी २१,८६२ द.ल.घ.मि. पाणीसाठा होता त्या तुलनेत यावर्षी ३२,०२१ द.ल.घ.मि. पाणीसाठा झाला आहे. मागील वर्षीच्या ६० टक्के पाणीसाठ्याच्या तुलनेत यंदा ८८ टक्के साठा आहे.

मागील वर्षी कोकणात ८२ टक्के जलाशय साठा होता. चालू वर्षी तो ९३ टक्के आहे. मराठवाड्यात २३ टक्के पाणीसाठा होता तो आता ८४ टक्के आहे. नागपूरात गतवर्षी ५३ टक्के पाणीसाठी होता तो यावर्षी ८५ टक्के एवढा झाला आहे. अमरावती विभागात गतवर्षी ३६टक्के पाणी साठा होता त्यात यावर्षी लक्षणीय वाढ होऊन तो ८९ टक्के एवढा झाला आहे. नाशिक विभागात गतवर्षी ५८ टक्के पाणी साठा होता तो यावर्षी ७५ टक्के झाला आहे. तर पुणे विभागात गतवर्षी ७५ टक्के पाणी साठा होता तो यावर्षी ९२ टक्के एवढा झाला आहे.

----००-----